स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 16—11—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 226:—** प्रभाग क्र. २७—अ (जुना प्रभाग क्र. ४४—अ) अंतर्गत **{लोककर्म झोन 05}** दर्शन कॉलनी येथील श्री. केवटे ते श्री. दुबे यांच्या घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु. २६,२३,११२/— च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 736 दि. 18.11.2016 ला मंजुरी प्रदान करण्यात आली आहे, त्याप्रमाणे विभागाने कार्यादेश निर्गमित करावा, स्थायी समिती सभेपुढे विषय ठेवतांना विभागाने योग्य काळजी घ्यावी व पुन्हा अशी चूक करु नये या सूचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 227:–** प्रभाग क्र. ३ (ब) मधील विनोबा भावे नगर येथील गल्ली
**{लोककर्म झोन 05}** नं. २९,३१ आणि वनदेवी नगर येथे सिमेंट कॉंक्रीट रोडचे ड्रेन लाईनचे बांधकाम करण्याच्या रु. २९,९८,९२०/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन व निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 228:–** प्रभाग क्र. 2 अंतर्गत बनातवाला इंग्रजी प्राथमिक शाळेला
**{लोककर्म झोन 09}** संरक्षण भिंत, चौकीदार निवास, व्यवस्था फुटपाथ व सांडपाणी वहन व्यवस्था करण्यास्तव रु. 70,16,570/– रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 229:–** प्रभाग क्र. 15 मधील कुसुमताई वानखेडे सभागृहामागील नाग
**{लोककर्म झोन 02}** नदीवरील पुलाच्या बांधकामाच्या रु. 41,39,436/– च्या प्राकलनास मंजुरी देण्याचा तसेच पद क्र. A42101370616 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 230:–** प्रभाग क्र. 24 ब डिप्टी सिग्नल कुंभार मोहल्ला येथे सिमेंट
**{लोककर्म झोन 08}** कॉंक्रीट पेव्हमेंट करण्याबाबत रु. 36,24,659/– राशीच्या प्राकलनास मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 231:–** प्रभाग क्र. १८ अ येथील भुतेश्वर नगर येथे श्री मुरकुटे
**{लोककर्म झोन 06}** ते श्री नागपूरे यांच्या घरापर्यंत नाग नदीच्या भिंतीचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.४९,३२,२७१/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. A४२००१३७४६१५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 232:–** रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहाचे दैनंदिन
**{लोककर्म विभाग}** रखरखाव, सुरक्षा व्यवस्था, विद्युत उपकरणाचे संचालन, ध्वनी व्यवस्थेचे संचालन इत्यादी तत्सम कामांकरिता निविदा मागविण्यात आल्या असता, मे. स्पिक अॅन्ड स्पॅन सर्व्हीसेस यांची एकमेव रू. १३,७५,५००/– प्रति माह रकमेची निविदा प्राप्त आहे. निविदाकाराशी दर कमी करण्याबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी सुधारित दर रू. १३,५०,०००/– प्रति माह प्रमाणे काम करण्यास्तव लेखी सहमती दर्शविली आहे. करिता वरील प्रमाणे प्राप्त सुधारित रू. १३,५०,०००/– प्रति माह दराची निविदा मंजुर करण्याचा तसेच प्रथमतः तीन महिन्यांचा कालावधी करिता रू. ४०,५०,०००/– रकमेचा कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 233:–** ''कचरा घर मुक्त शहर'' योजना राबविण्यासाठी स्थायी
**{आरोग्य विभाग}** समिती ठराव क्र. 200, दि. 24.12.2007 अन्वये–10 वर्षाच्या कालावधीसाठी कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट लि. यांना काम देण्याकरिता वित्तीय व प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. त्यानंतर स्थायी समिती ठराव क्र. 675, दि. 13.02.2014 अन्वये आर्थिक मान्यता घेण्यात आली होती.

स्थायी ठराव क्र. 39, दि 12.06.2014 अन्वये वार्षिक खर्च रू. 27 कोटी प्रमाणे उर्वरित पाच वर्षाकरिता रू. 135 कोटी खर्चाची मान्यता घेण्यात आली होती. परंतु सदर कामावर

(WPI) अंतर्गत झालेल्या वाढीनुसार चालु आर्थिक वर्ष 2017—18 करीता एकूण 27 कोटी पेक्षा मागील सहा महिन्यात एकूण रू. 34,33,03,706/— मे. कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट लि. यांना रक्कम प्रदान करण्यात आले असून झालेल्या अतिरिक्त खर्च रू. 7,33,03,706/— खर्चास व पुढील सहा महिन्यात होणाऱ्या अंदाजीत रू. 35 कोटी खर्चाची तसेच एकूण चालू आर्थिक वर्षात माहे मार्च 2018 पर्यंत च्या एकूण अंदाजीत खर्च रू. 43 कोटी खर्चास आय व्यय पद क्रमांक (213/B-41308) A24101231701 अंतर्गत प्रावधानामधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर शहरातील कचरा उचलण्याचे कंत्राट देण्यात आलेल्या कार्यरत खाजगी एजन्सीला त्यांनी सादर केलेल्या प्रतीमाह देयकानुसार रक्कम देण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. २०० दि. २४/१२/२००७ अन्वये रु. ६५.११ कोटी रक्कमेस तसेच ठराव क्र. ३९ दि. १२/०६/२०१४ अन्वये रु. १३५.०० कोटी असे एकूण रु. २००.११ कोटी रक्कमेस स्थायी समितीची मंजूरी प्राप्त आहे.

दि. ३१/०८/२०१७ पावेतो एजन्सीने प्रतीमाह सादर केलेल्या देयकानुसार रु. २४०. ४३ कोटी रक्कमेचे भुगतान करण्यात आलेले आहे. उर्वरीत भुगतान करण्यात आलेल्या रु. ४०.३२ कोटी रक्कमेस स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आहे. एजन्सीने सप्टेंबर व ऑक्टोंबर या दोन महिन्याचे रु. ९.७९ कोटींची देयके सादर केलेली आहेत. तसेच नोव्हेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ पावेतो अंदाजे सरासरी प्रतीमाह रु. ५.५० कोटी प्रतीमाह प्रमाणे पाच महिन्यांचे रु. २७.५० कोटी रक्कमेचा खर्च देयकापोटी अपेक्षीत आहे.

या कामाकरिता स्थायी समितीने रु. २००.११ कोटी रक्कमेस दिलेल्या मान्यतेपेक्षा रु. ४०.३२ कोटी रक्कमेचा जास्त झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी तसेच सप्टेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ पावेतो होणाऱ्या रु. ३७.२९ कोटी अपेक्षीत खर्चास वित्तीय मंजूरीस विभागाच्या निवेदनाप्रमाणे व सुचनेनुसार वरील विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 234:—** प्रभाग क्र. ३५—ब अंतर्गत संत गजानन सोसा.,
**{लोककर्म झोन 04}** समाजभुषण सोसा., आदिवासी सोसा. व मनिष नगर परिसरात रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४९,९९,६९६/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 235:—** आरोग्य विभागाचे हिवताप व हत्तीरोग विभागाकरीता
**{आरोग्य विभाग}** शहरातील दहा झोन अंतर्गत मोठया प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव होत असतो सोबतच शहराच्या विविध भागात मोठ—मोठे डबके पाण्याने तुडुब भरलेले असतात. त्या मध्ये डासांची उत्पत्ती मोठया प्रमाणात होते. त्यावर एम.एल.ओ. किटक नाशक फवारणी केल्याने डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण राखण्यास मदत होते. फवारणी करिता २४००० लिटर एम.एल.ओ ऑईल खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे

वर्ष २०१७—१८ स्थायी समिती ठराव क्रंमाक १२७ दिनांक ०४/०८/२०१७ नुसार में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशिन कल्याण यांचे वार्षिक दरकरार प्रति लिटर रुपये १७२/— प्रमाणे मान्य असुन त्यानुसार एम.एल.ओ ऑईल २४००० लिटर खरेदीवर एकुण रुपये ४१,२८,०००/— खर्च अपेक्षित आहे सदर खर्च आय—व्यय पद क्रमांक A—४४२०१२७२२०२ (नागरी घनकचरा व्यवस्थापन अमंलबजावणी) या मधुन करण्याचे प्रस्तावित आहे. करिता एम.एल.ओ ऑईल खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 236:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 23 क हिवरी कोठा येथे 1) भुखंड क्र. 409 ते श्री. शाहु व 2) श्री. डांगे ते श्री. रामटेके यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे कामास्तव रु. 3275896/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2017—18 मध्ये रु. 3275896/— लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 237:—** {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ३४—क अंतर्गत जानकी नगर ते न्यु अमरनगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४७,१३,२७०/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचे अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 238:—** {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 24 ब डिप्टी सिग्नल साखरकरवाडी येथे साखरकर यांचे घरापासुन सुपर फ्लोर मिल आणि डॉ. नियासी ते मदरसा येथील सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव रु. 26,91,542/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 239:—** {लोककर्म झोन 03} नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा (जिल्हास्तर) योजना अंतर्गत एकुण रू. 70,00,000/— रकमेचा 3 (तीन) कामाचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचे असून या कामाकरीता महाराष्ट्र शासन यांचे 100 टक्के अनुदान प्राप्त असून या करीता म.न.पा. च्या दक्षिण नागपूर क्षेत्रातील खालील दिलेल्या यादीनुसार एकूण 3 कामांचा समावेश करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनीय राशी | तांत्रीक मंजूरीचे क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 34 सिध्देश्वरी येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2499000 | 66/ई.ई. (झोन—3) दि. 23.10.2017 |
| 2 | प्रभाग क्र. 34 बाबा ताजूददीन नगर व मॉ भगवती नगर येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2450000 | 67/ई.ई. (झोन—3) दि. 23.10.2017 |
| 3 | प्रभाग क्र. 34 मॉ भगवती नगर येथे गडर लाईनचे काम करणे | रू. 2051000 | 68/ई.ई. (झोन—3) दि. 23.10.2017 |
| | एकूण राशी | रू. 7000000/— | |

**ठराव क्रमांक 240:—** {कर विभाग} नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाव्दारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्यासंदर्भात प्रश्न समितीने विचारात घेवून,

मा. सभापती कर आकारणी व कर संकलन समितीच्या दिनांक 29.05.2017 बैठकीत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाव्दारे होणाऱ्या मालमत्ताच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर भरणा केल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्यासंदर्भात सदर प्रस्ताव तयार करून सभागृहाची मान्यता घेऊन प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरी करीता पाठविण्याचा निर्णय कर आकारणी व कर संकलन समितीने घेतलेला आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या सिमेअंतर्गत मालमत्ता खरेदी विक्रीची प्रकरणे नागपूर शहरातील चार दुय्यम निबंधक कार्यालयात हजारो मालमत्तांची नोंदणी होत असते. मालमत्तेच्या खरेदी विक्रीची नोंदणी करतांना मालमत्तेसंबंधी मुद्रांक शुल्क अन्य नोंदणी शुल्काचा महसुल दुय्यम निबंधक कार्यालयाव्दारे मालमत्ता धारकांकडून वसुल केला जातो.

परंतु खरेदी विक्री नोंदणी करतांना विक्रेता संबंधित मिळकती करीता updated मालमत्ता कर आकारणी वरून घेवून पावती सादर न करता मिळकतीच्या जुन्याच status च्या अनुषंगानें असलेल्या मालमत्ता कराची पावती सादर करतो. त्यामुळे मिळकतीमध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने करावयाचे मालमत्ता कर पुनर्निर्धारण वेळीच होत नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. हयाकरीता मालमत्ता कर व कर आकारणी विभागाचे उक्त मिळकतीच्या मालमत्ता कर संबंधी 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळकतीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराची नोंदणी करता सक्तीचे करण्याचे निर्देश नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना शासन स्तरावरून देणेबाबत शिफारस करणेबाबत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने मंजूरी प्रदान केली, महानगरपालिकेची मंजुरी आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या सभागृहासमोर ठेवण्याची शिफारस करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 241:–</u>**
**{लोककर्म झोन 05}**

प्रभाग क्र. 27 – अ अंतर्गत किर्ती नगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 36,55,730/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 242:–</u>**
**{लोककर्म झोन 08}**

प्रभाग क्र. 23 क दत्तनगर येथे जुनेजा ते श्री. जैन यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे कामास्तव रु. 2851285/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2017–18 मध्ये रु. 2851290/– लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**<u>ठराव क्रमांक 243:–</u>**
**{उद्यान विभाग}**

प्रभाग क्र.37 (अ) परसोडी (गोपाल नगर), त्रिशरण बौध्द विहार उद्यानात विविध स्थापत्य कामे करण्याचे रू. 29,21,983/– (अक्षरी एकोणतीस लक्ष एकविस हजार नऊशे त्र्यांशी फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. (सदर खर्च पद क्र. A46001673101 अंतर्गत प्रस्तावित)

**<u>ठराव क्रमांक 244:–</u>**
**{उद्यान विभाग}**

प्रभाग क्र.11 (अ) मानकापूर, काटोले लेआऊट येथे उद्यान विकसीत करण्याचे रू. 27,87,067/– (अक्षरी सत्ताविस लक्षसत्त्यांशी हजार सूदुसष्ट फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. (सदर खर्च पद क्र.A46001673101 अंतर्गत प्रस्तावित)

**<u>ठराव क्रमांक 245:–</u>**
**{लोककर्म झोन 03}**

प्रभाग क्र. ३२–क अंतर्गत जवाहर नगर येथील मानेवाडा रोड ते आदर्श विद्या मंदीर पर्यंत रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रू. ३५,२९,५३०/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 246:—** प्रभाग क्र. 68 अ+ब मध्ये संताजी मेंघरे लेआऊट, पी.एम.जी.
**{लोककर्म झोन 04}** सोसायटी, उमंग सोसायटी, रामकृष्ण सोसायटी, साईकृपा इत्यादी भागातील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. एस. के. मेहता ॲन्ड कंपनी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 0.01 टक्के कमी दराची निविदा रूपये 49,98,773/– (रूपये एकोण पन्नास लक्ष अठ्ठयानऊ हजार सातषे त्र्याहत्तर रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा तसेचो हे काम पद क्रमांक A4200470202 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 247:—** प्रभाग क्र. 23 क जगजीवनराम नगर येथे श्री. पटेल ते श्री.
**{लोककर्म झोन 08}** लुनावत यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे काम करण्यास्तव रु. 42,84,552/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A42001470511 मधून रु. 42,84,552/— तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 248:—** झोन क्र. 7 आदर्श नगर, संजय गांधी नगर, येथे नाल्याची
**{लोककर्म झोन 09}** सुरक्षा भिंत बांधण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.बी. यादव यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 42,74,579/— पेक्षा 10% टक्के कमी दराची रू. 38,47,121/—(रूपये अडतीस लक्ष सत्तेचाळीस हजार एकशे एकविस) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्र. (A4020047020) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 249:—** प्रभाग क्र. 27 — क अंतर्गत कवेलू क्वार्टर व पंचमुखी हनुमान
**{लोककर्म झोन 05}** मंदीर जवळ न्यु नंदनवन येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 29,98,830/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 250:—** प्रभाग क्र. 33, क मधील भगवान नगर बॅक कॉलोनी येथील
**{लोककर्म विभाग}** रोडचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 49,89,230/–रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 680(A42001374612) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 251:—** प्रभाग क्र. ४२ ब (नवीन प्रभाग क्र. १८ अ) महाल येथे
**{लोककर्म झोन 06}** संघ बिल्डींगजवळील व गायकवाड व पाण्याच्या टाकीजवळ सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकामास्तव मे. दिशा डायनामीक बिल्डवेल प्रा.लि. यांची प्राकलनिय दरांपेक्षा १२.०० टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २६,३९,८१९/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 252:—** नवीन प्रभाग क्र. १८ अ (जुना प्रभाग क्र. ४१ अ) अंतर्गत
**{लोककर्म झोन 06}** महाल येथे दटके निवास जवळ स्टोन आर्म फ्लोरिंगचे कामास्तव तयार केलेल्या **रू.** २५,६५,५७९/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A28901341002 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 253</u>:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. १९ अ येथील मराठी तेलीपूरा, शितला माता मंदीर जवळ बजरिया कृष्णा टॉकीज पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.२८,०७,२४२/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A२२००१३३०८०२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 254</u>:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. ४२ अ (नवीन प्रभाग क्र. १८ अ) महाल येथे श्री शौकत कुरेशी व अतुल जिभकाटे यांच्या घराजवळ सिमेंट कॉक्रींट रोडचे बांधकामास्तव मे. दिशा डायनामीक बिल्डवेल प्रा.लि. यांची प्राकलनिय दरांपेक्षा १४.०१ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ३०,०८,९४४/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 255</u>:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. ३७ 'क' अंतर्गत गिट्टीखदान ले—आऊट व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. २९,९९,७०२/— रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 256</u>:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. ३७ 'क' अंतर्गत अत्रे ले—आऊट व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. २९,९९,९५७/— रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 257</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर